<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ अमिरा विरसिंग वळवी यांचा दिनांक ०९.०७.२०२५ रोजी तहकुब केलेला सरतपास वादीचे विधीज्ञ जे.बी. दुसाणे यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>

११. आता मला दस्तऐवज यादी निशाणी क्र. ३ सोबत दाखल केलेले गट क्र. ३१/२ चे सात बारा उताऱ्याची दिनांक १९.०६.२०१८ रोजीची साक्षांकित प्रत दाखविण्यात आली, सदरील दस्त सार्वजनीक दस्त असल्यामुळे त्यास **निशाणी क्र. ६५** देण्यात येत आहे. मी गट क्र. ३१/२ चा तलाठी देवलीपाडा यांनी दिनांक १०.०४.२०१८ रोजी दिलेला चतुर्सिमेचा नकाशाची खरी नक्कल दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. ६६** देण्यात येते. आता मला दस्तऐवज यादी क्र. ६३ सोबत दाखल केलेले दस्त फेरफार नोंद क्र.३४५०, २४, ८१, १४० आणि १८० चे दिनांक १३.०३.२०२५ रोजीचे प्रमाणीत प्रती दाखल केले आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. ६७ ते ७१** देण्यात येत आहे.

<u>सरतपास पुर्ण.</u>

<u>साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादीचे विधीज्ञ ए.जे.वळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>

१२. माझे नाव अमिरा विरसिंग वळवी आहे. माझे वय ३५ वर्षे आहे. मी शेती व्यवसाय करते व गृहीणी आहे. मी दावा शेतीसाठी दाखल केलेला आहे. मला दाव्याचा क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील वादी व प्रतिवादी हे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ४ ही वादी व प्रतिवादी यांची सख्खी बहीण आहे.

१३. दावा गट क्र. ३२/२ बाबत दाखल केलेला आहे. वादमिळकत माझे आजी नंदुबाई दित्या वळवी यांचेकडे नंदल्या बाबला वळवी याचेकडुन आली होती. नंदल्या बाबाला यांची नंदुबाई ही बहीण होती. वादमिळकतीचे एकुण क्षेत्रफळ दहा एकर आहे. मला

वादमिळकतीचे चतुर्सिमा सांगता येणार नाही. मयत प्रतिवादी क्र. १ शामसिंग यांचे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले होते. मयत शामसिंग हे इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत सार्वजनीक हायस्कुल नवापुर येथे व इयत्ता ११ वी ते १२ वी पर्यंत शिवाजी हायस्कुल नवापुर येथे शिकले. प्रतिवादी क्र. २ सुधाकर दित्या वळवी यांचे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले आहे. मयत प्रतिवादी क्र. ३ करणसिंग दित्या वळवी याचे शिक्षण देखील इयत्ता १२वी पर्यंत झाले होते. मयत प्रतिवादी क्र. १ शामसिंग हे तलाठी म्हणुन नौकरीस होते व ते तलाठी म्हणुनच सेवानिवृत्त झाले. हे म्हणणे खरे नाही की, शामसिंग हे मंडळ अधिकारी म्हणुन सेवानिवृत्त झाले होते.

१४. प्रतिवादी क्र. ४ सावंती फुलसिंग वसावे यांचा विवाह झालेला आहे. सावंती हया तारापुर डुगली, ता. नवापुर येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीत सावंती हिचा हक्क आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकत आजीची असल्यामुळे सावंती हिला वादमिळकतीत हक्क आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्यातील शपथपत्रातील मजकुर की, प्रतिवादी क्र. १ ते ३ हे बाहेरगावी शिक्षण घेत असल्यामुळे त्यांना वादमिळकतीत हक्क नव्हता हे मी खोटे नमुद केले आहे.

१५. हे मला सांगता येणार नाही की, मयत प्रतिवादी क्र.१ शामसिंग यांनी वादमिळकतीबाबत तलाठी, मंडळअधिकारी, प्रांत अधिकारी व विभागीय आयुक्त यांचेकडे अर्ज व अपिल केले होते व सदरील अर्ज व अपिलाचा निकाल आमचे विरुध्द झाला होता.

१६. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील मयत वादी विरसिंग व वादी क्र. २ धिरसिंग हे चाळीस वर्षापासुन वादमिळकतीत उत्पन्न घेत आले. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी शिक्षणासाठी बाहेर असल्यामुळे त्यांना वादमिळकतीतील उत्पन्न दिले नव्हते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, त्या उत्पन्नातुन त्यांचे शिक्षणासाठी खर्च केला होता. हे म्हणणे खरे आहे की, शिक्षणासाठी खर्च केल्याबाबत पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पुराव्याचे शपथपत्रात परिच्छेद क्र. ७ मधील ८ व्या ओळीतील मजकुर की, शामसिंग यांचेकडे नौकरी व पेशंन आहे म्हणुन त्याला

वादमिळकतीत हिस्सा नाही.  हे मला माहिती आहे की, शिक्षाणासाठी बाहेरगावी गेल्यामुळे जमीनीतील हक्क जात नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की,  आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण,
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–xx
**(धनंजय एस. देवरे)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर., नवापुर.

नवापुर
दिनांक –१८.०९.२०२५